# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)

### -: सभेचे इतिवृत्त :-

मा. प्रशासक तथा अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती, मनपा नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दिनांक 27.01.2025 रोजी वेळ स. 11.30 वाजता नविन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात संपन्न झालेल्या वृक्ष प्राधिकरण सभेचे इतिवृत्त.

या सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित आहेत.

1) श्रीमती. आंचल गोयल, अति. आयुक्त (शहर)
2) श्री. गणेश राठोड, उपायुक्त (उद्यान) तथा वृक्ष अधिकारी
3) श्री. अमोल चौरपगार, वृक्ष संवर्धक

या सभेत खालील प्रमाणे नमूद विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

### विषय क्र. 1

कार्यालयास दिनांक 07.01.2025 ला प्राप्त मा. अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांनी परिसरातील प्रस्तावित विविध इमारतीच्या, अंर्तगत रस्ता व क्रीडा संकुलच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या 129 नग झाडास कापणी करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली होती.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील जागेवर नर्सिंग महाविद्यालय, मुलींचे वस्तीगृह, बहुस्तरीय वाहन पार्किंग, क्रीडा संकुल, नोंदणी कार्यालय, Auditorium Building इत्यादी नवीन इमारतीचे व इमारतीचे जोडपूल परीसरातील अंतर्गत रस्ते, खेळाचे मैदान निर्मितीचे बांधकाम प्रस्तावित असून या परिसरात असलेली **पुरातन (हेरिटेज)** अशोका-3, उंबर-1, कडूनिम-1, कदंब-1, गुलमोहर-4, चिंच-2, चिचबिलाई-1, जांभूळ-1, परड-2, पिंपळ+चिचबिलाई-1, पेल्ट्राफार्म-1, बकुळ-2, बाभूळ-2, महारुख-1, रेनट्री-1, सिसम-1, वड-1 (प्रत्यारोपण) एकूण 26 व **नॉन हेरीटेज** अशोका-1, आंबा-4, आडजात-1, उंबर-3, कडूनिम-7, करंजी-3, कांचन-1, किन्ही-1, केशिया-3, गुलमोहर-9, गोडनिंब-2, चिचबिलाई-1, जांभूळ-3, पिंपळ-17 (प्रत्यारोपण), पेल्ट्राफार्म-14, पेरू-1, बकुळ-1, बदाम-1, बाभूळ-4, महारुख-1, रेनट्री-1, शेवगा-1,

सप्तपर्णी-2, सिसम-2, सिताफळ-1, सुबाभूळ-18 अशी एकूण (26+103=129) 129 नग झाडे या प्रस्तावित विविध इमारतीच्या बांधकामात व अंतर्गत रस्ते, खेळाचे मैदान निर्मितीच्या बांधकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

**या प्रकरणी महाराष्ट्र टाईम्स वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 845/PR अन्वये दिनांक 10.01.2025 ला जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले असता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीवर 24 नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्यानुषंगाने दिनांक 21.01.2025 रोजी आक्षेपकर्त्यांची सुनावणी घेण्यात आली असून सुनावणीचे आदेश नस्तीस सलग्न आहे.**

या प्रकरणी अर्जदारास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित नवीन विविध इमारतीच्या बांधकामात व अंतगर्त रस्ते खेळाचे मैदान निर्मितीच्या कामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) 26 व नॉन हेरीटेज 103 अश्या एकूण 129 नग झाडाच्या मोबदल्यात नविन सावलीची 4216 नग झाडांची लागवड करण्याबाबत पत्र देण्यात आले आहे. दिनांक 15.01.2025 च्या पत्रान्वये अर्जदाराचे तोडण्यात येणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडाच्या मोबदल्यात पर्यायी वृक्ष संस्थेच्या परिसरात लागवड करण्यात येईल. तसेच संस्थेच्या सामाजिक उपक्रमा अंतर्गत नागपूर शहरातील विविध प्राथमिक शाळांमध्ये वृक्ष लागवड करून त्याची देखभाल करण्यात येईल या स्वरूपाचे पत्र प्राप्त आहे.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित नविन विविध इमारतीच्या बांधकामात व अंतर्गत रस्ते, खेळाचे मैदान इत्यादी निर्मितीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन (हेरीटेज)** 26 व **नॉन हेरीटेज** 103 अश्या एकूण 129 नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच,** जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 **अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम** (4) (ब) अन्वये कापणी **करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे** कापणी करण्यात येणाऱ्या **झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान** 6 **फुट इतक्या उंचीची** 4216 नग **नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 43,45,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 4,34,500/- असे एकूण रु. 47,79,500/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली विविध प्रजातीची **पुरातन (हेरीटेज)** 26 व **नॉन हेरीटेज**

103 अशी एकूण 129 नग झाडास जमिनिपासून कापणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

चर्चेदरम्यान सदर ठिकाणच्या प्रस्तावित विविध नवीन इमारतीच्या बांधकामात बाधित होणाऱ्या पुरातन (हेरीटेज) वृक्षास कापणी करण्याव्यतिरिक्त इतर पर्याय उपलब्ध आहे का? याबाबत वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील परिसरात मा. प्रशासक तथा अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती यांनी अर्जदार श्री. रवी चव्हाण, अधिष्ठाता इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर व श्रीमती. वर्षा घुशे, कार्यकारी अभियंता एकात्मिक घटक (वै.) सा. बां. विभाग, नागपूर यांच्यासह प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून निर्णय घेण्यात येईल असे सभेत ठरले.

**विषय क्र. 2**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. टीकम खांडवाणी

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 30.07.2024

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ-1, झाडाची गोलाई-119 इंच, झाडाचे अंदाजे वय-114 वर्ष (हेरीटेज).

**प्रशासकीय शुल्क :- रु.** 500/-

**झाडाचे विवरण :-** छपरू नगर सोसायटी नं. 1 गरोबा मैदान, नागपूर येथील घरपरिसरात असलेल्या एक पिंपळ वृक्षाच्या परिसरात व इमारती कडील बाजूस झुकलेल्या फांद्या छाटणी मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर समितीत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती या वृक्षाच्या परिसरात व इमारती कडील बाजूस झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 3**

**अर्जदाराचे नाव :-** महाराष्ट्र, रेल इन्फ्रास्ट्रक्चर कॉर्पोरेशन लि.

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-**31.12.2024

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ-3, झाडाची गोलाई-120-126 इंच, झाडाचे वय-115-121 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** लकडगंज पोलीस स्टेशन समोर, नागपूर येथील परिसरात असलेल्या तीन पिंपळ वृक्षाच्या विद्युत तारेवर व रस्त्यावर झुकलेल्या फांद्या छाटणी मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या विषयावर समितीत साधकबाधक चर्चा होऊन या वृक्षाच्या विद्युत तारेवर व रस्त्यावर झुकलेल्या फांद्या कापणी करण्यास समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 4**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. लिलाधर देवाजी धकाते

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-**21.12.2024

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ-1, झाडाची गोलाई-121 इंच, झाडाचे वय -116 वर्ष (हेरीटेज).

**प्रशासकीय शुल्क :- रु. 500/-**

**झाडाचे विवरण :-** देवराव आटा चक्की जवळ, नविन बस्ती, तांडापेठ, नागपूर येथील अर्जदाराच्या घरपरिसरात असलेल्या एक पिंपळ झाडाच्या विद्युत तारेवर व रस्त्यावर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या मंजुरी मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर समितीत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती या झाडाच्या विद्युत तारेवर व रस्त्यावर झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 5**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. सुरज चोपडा

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 26.12.2024

**झाडाची प्रजाती :-** कडूनिम-1, झाडाची गोलाई-92 इंच, झाडाचे वय- 88 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** ओम हायस्कूल जवळ, लालगंज खैरीपुरा, नागपूर येथील अर्जदाराच्या घरासमोर रोडलगत असलेल्या एक कडूनिम झाडाच्या विद्युत तारेवर, इमारतीवर व रस्त्यावर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबत मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर समितीत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती या झाडाच्या विद्युत तारेवर, इमारतीवर व रस्त्यावर झुकलेल्या फांद्या कापणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**विषय क्र. 6**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. सागर उमाजी उमरेडकर

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 30.12.2024

**झाडाची प्रजाती :-** पिंपळ-1, झाडाची गोलाई-122 इंच, झाडाची वय-88 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** राऊत चौक, लालगंज नागपूर येथील अर्जदाराच्या घरासमोर असलेल्या एक पिंपळ वृक्षाच्या इमारतीवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर समितीत साधकबाधक चर्चा

होऊन या झाडाच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**विषय क्र. 7**

**अर्जदाराचे नाव :-** श्री. नीरज पद्माकर मौदेकर

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 02.01.2025

**झाडाची प्रजाती :-** कडूनिम-1, झाडाची गोलाई-88 इंच, झाडाची वय-85 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** पाचपावली ठक्करग्राम, खाटिकपुरा, नागपूर येथील अर्जदाराच्या घरासमोर रोडलगत असलेल्या एक कडूनिम वृक्षाच्या अर्जदाराच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर समितीत साधकबाधक चर्चा होऊन या झाडाच्या इमारतीवर व परिसरात झुकलेल्या फांद्यांची कापणी करण्याची समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**विषय क्र. 8**

**अर्जदाराचे नाव :-** श्रीमती. संगीता भैसावारे

**अर्जाचा प्राप्त दिनांक :-** 07.01.2025

**झाडाची प्रजाती :-** वड-1, झाडाची गोलाई-157 इंच, झाडाची वय-151 वर्ष (हेरीटेज).

**झाडाचे विवरण :-** ऑरेंज सिटी स्कूल, मोहन नगर, नागपूर येथील परिसरात असलेल्या एक वड वृक्षाच्या शाळेच्या इमारतीवर, परिसरात व विद्युत तारेवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याबाबतच्या विषयावर समितीत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती या झाडाच्या शाळेच्या इमारतीवर, परिसरात व विद्युत तारेवर झुकलेल्या फांद्या छाटणी करण्याची समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

**उपायुक्त (उद्यान)**
**तथा**
**वृक्ष अधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रशासक**
**तथा**
**अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**